महाराष्ट्र नगरपरिषद अग्निशमन सेवा संवर्ग (गट-क) कर्मचाऱ्यांचे सन २०२५ मधील नियतकालिक सर्वसाधारण बदली आदेश.

# नगरपरिषद प्रशासन संचालनालय

७ वा मजला, बेलापूर भवन,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
क्र.नपप्रसं/संवर्ग-बदली/२०२५/अग्नि/ ४२९६
दिनांक : ३० मे, २०२५ 30 MAY 2025

वाचा:

१. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५
२. महाराष्ट्र नगरपरिषद/ नगरपंचायती, औद्योगिक नगरे राज्यसेवा (समावेशन, सेवाप्रवेश व सेवाशर्ती) नियम, २००६ (सुधारणासह)
३. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एमसीओ२०१७/प्र.क्र.११९/नवि-१४, दि.११ मे २०१७.
४. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र: एसआरव्ही.२०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२, दि.०९ एप्रिल २०१८.

## आदेश

उपरोक्त वाचा क्र.३ नगर विकास विभागाचे दि. ११-०५-२०१७ रोजीचे शासन निर्णयानुसार महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या बदल्या करण्यास सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना घोषित करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ आणि वाचा क्र. ३ मधील तरतुदी व प्राप्त अधिकारानुसार नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा संवर्ग कर्मचाऱ्यांच्या सन २०२५ या वर्षातील नियतकालिक सर्वसाधारण बदल्या करण्यात येत असून, त्यांची रकाना क्र.५ मध्ये दर्शविलेल्या नगरपरिषदा/नगरपंचायतीमध्ये बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | संवर्ग व श्रेणी | सद्या कार्यरत नगरपरिषद / नगरपंचायत व जिल्हा | बदलीने पदस्थापना केलेली नगरपरिषद / नगरपंचायत व जिल्हा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | प्रफुल्ल हरीश काळे | अग्निशमन सेवा श्रेणी क | रिसोड जि वाशिम | काटोल जि नागपूर |
| २ | साळवी महेश दयानंद | अग्निशमन सेवा श्रेणी क | रत्नागिरी जि रत्नागिरी | महाड जि रायगड |
| ३ | जगताप हर्षल सुरेश | अग्निशमन सेवा श्रेणी क | कन्हान पिंपरी जि नागपूर | भद्रावती जि चंद्रपूर |
| ४ | लांडगे राजेंद्र अशोकराव | अग्निशमन सेवा श्रेणी क | कळमेश्वर जि नागपूर | वरुड जि अमरावती |
| ५ | तेलगे संतोष केशव | अग्निशमन सेवा श्रेणी क | पुसद जि यवतमाळ | तळेगाव दाभाडे जि पुणे |
| ६ | बाथम अनुज कुमार राम अवतार | अग्निशमन सेवा श्रेणी क | कारंजा (वाशिम) जि वाशिम | कळमेश्वर जि नागपूर |
| ७ | जोगदंड रुपेश विश्वनाथ | अग्निशमन सेवा श्रेणी क | तेल्हारा जि अकोला | शेगाव जि बुलढाणा |

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | संवर्ग व श्रेणी | सद्या कार्यरत नगरपरिषद / नगरपंचायत व जिल्हा | बदलीने पदस्थापना केलेली नगरपरिषद / नगरपंचायत व जिल्हा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ८ | सोमकुवर प्रीतम गंगाधर | अग्निशमन सेवा श्रेणी क | नरखेड जि नागपूर | ब्रम्हपुरी जि चंद्रपूर |
| ९ | मिलिंद भिमराव डुकरे | अग्निशमन सेवा श्रेणी क | उमरेड जि नागपूर | चिमूर जि चंद्रपूर |
| १० | दाहाट हर्षल पुरुषोत्तम | अग्निशमन सेवा श्रेणी क | वरुड जि अमरावती | कन्हान पिंपरी जि नागपूर |
| ११ | काळे अभिषेक दिपक | अग्निशमन सेवा श्रेणी क | अकोट जि अकोला | उमरेड जि नागपूर |

१. उक्त अधिकारी/कर्मचारी यांना सध्याच्या कार्यरत पदावरुन दि. ३०-०५-२०२५ रोजी (म.नं.) पासून कार्यमुक्त करण्यात येत आहे. मुख्याधिकारी / प्रशासक यांनी बदलीमुळे रिक्त राहणाऱ्या पदाचा अतिरिक्त कार्यभार संवर्गातील इतर कर्मचाऱ्यास देण्यात यावा.

२. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी पदस्थापना दिलेल्या नगरपरिषदा/नगरपंचायतींमध्ये दि. ०२-०६-२०२५ रोजी रुजू व्हावे. मुख्याधिकारी यांनी संबंधित कर्मचाऱ्यांचा अनुपालन अहवाल संचालनालयास तात्काळ सादर करावा.

३. संबंधित अधिकारी/कर्मचारी हे कार्यमुक्त झाल्यानंतर पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू न झाल्यास व परस्पर रजेवर गेल्यास ती रजा अनधिकृत समजण्यात येवून संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

४. संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना नियमोचितरित्या लागू असलेले बदली नंतरचे वेतन व भत्ते बदलीने पदस्थापना होणाऱ्या नगरपरिषदा / नगरपंचायतीमधून काढण्यात यावेत, तसेच संबंधित कर्मचाऱ्याचे अंतिम वेतन प्रमाणपत्र तात्काळ देण्यात यावे.

५. बदली आदेशान्वये केलेली पदस्थापना रद्द करणे, त्यात बदल करणे यासाठी कोणत्याही प्रकारचे दडपण / दबाव आणू नये. तसे केल्याचे आढळून आल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम, २३ नुसार शिस्तभंगाची कारवाई होऊ शकेल याची संबधित कर्मचाऱ्याने नोंद घ्यावी.

आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई ★

(मनोज रानडे भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रत:

१. मा. प्रधान सचिव (नवि २), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. आयुक्त महानगरपालिका, संबंधित मनपा.
३. सह आयुक्त/उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व).
४. सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व).
५. नगराध्यक्ष, नगरपरिषद/नगरपंचायत.
६. मुख्याधिकारी / प्रशासक, नगरपरिषद/नगरपंचायत.
७. संबंधित कर्मचारी.
८. निवड नस्ती.